दि. 07/07/2023

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेकवक :- श्री सचिन नानासाहेब रोटे, वय 30 वर्ष, पद- सहायक तांत्रीक अधिकारी (कंत्राटी), नेमणुक- पंचायत समिती कार्यालय सोयगाव, ता.सोयगाव जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये 4000/- स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सोयगाव, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री सचिन नानासाहेब रोटे, वय 30 वर्ष, पद- सहायक तांत्रीक अधिकारी (कंत्राटी), नेमणुक- पंचायत समिती कार्यालय सोयगाव, ता.सोयगाव जिल्हा औरंगाबाद रा. नविन वायगव्हाण वैजापुर ता. वैजापुर जिल्हा औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 4000/- |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती संगिता पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विहिरीचे मजुरीचे मस्टर प्रमाणे बिल मंजुर करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या स्वत:च्या शेतीमध्ये महात्मागांधी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या विहिरीचे मजुरीचे मस्टर प्रमाणे बिल मंजुर करण्याकरिता प्रतिमस्टर 1000/- हजार रुपये या प्रमाणे पाच मस्टरचे 5000/- रुपयांची आ.लो.से. श्री. रोटे यांनी लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 07/07/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. रोटे यांनी तडजोडीअंती 4000/- रुपये मागणी करुन पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून पंचायत समिती कार्यालय सोयगाव येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. सोयगाव औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक, संगिता पाटील यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं. विलास चव्हाण, शिरीष वाघ, चालक सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.